पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम
काटा रोड, सिव्हील लाईन, वाशिम ता.जि.वाशिम
कार्यालय दुरध्वनी क्र. ०७२५२-२३४८३४
ई-मेल आयडी :- sp.washim@mahapolice.gov.in
Website : www.washimpolice.gov.in

---

क्रमांक:पोअवा/आस्था/सर्व सा.बदल्या/4955 /२०२२
कार्यालय पोलीस अधिक्षक वाशिम.
वाशिम. दिनांक :- 13 APR 2022

**विषय :- पोलीस अंमलदार यांच्या सर्वसाधारण बदल्या सन-२२-२३**

**परीपत्रक :-**

१) महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचा सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ महाराष्ट्र पोलीस अधिनियम यात आणखी सुधारणा करण्या करीता अध्यादेश दिनांक १६/०२/२०१५ व मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमसं/३/अधिसुचना/१४/२०१४/७३, दिनांक २५/०२/२०१५ आणि महाराष्ट्र शासन गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक:न्यायाप्र ३११५/प्र.क्र.८/पोल-३, दिनांक १ जुलै २०१५ मधिल खालील तरतुदी विचारात घेवुन जिल्हा स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळद्वारे बदल्या करण्यात येणार आहेत. त्यामुळे आपले येथे नेमणूकीस असलेले पोलीस अंमलदार **(पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक)** यांचे नांवाची यादी सह त्यांचे विनंती अर्ज या कार्यालयास **दिनांक२६ एप्रील, २०२२ पर्यंत ई-मेल आयडी -** sp.washim@mahapolice.gov.inसादर करावेत.

२) पोलीस दलातील कोणत्याही पोलीस स्टेशन / शाखा व युनिट मधील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावर एखादया कर्मचाऱ्यांची पदस्थापना झाल्यानंतर, तो कर्मचारी पदस्थापनेच्या ठिकाणी सामान्यत: **जास्तीजास्त पाच वर्षे कालावधीपर्यंत** राहू शकतो. तथापि प्रशासकीय कारणास्तव व अन्य कारणास्तव संबंधित आस्थापना मंडळाच्या शिफारशीनुसार आणि संबंधित पोलीस शिपाई यांची बदली सामान्य पदावधी पूर्ण होण्यापूर्वी देखील होवू शकते.

३) पोलीस कर्मचा-यांना एका पोलीस स्टेशन व शाखेमध्ये नेमणुकीच्या दिनांकापासुन पाच वर्षाचा कालावधि ठेवण्यात आला आहे. पाच वर्षापेक्षा अधिक सेवा झाली असल्यास त्यांची तात्काळ अन्यत्र बदली करण्यात येईल.

४) दि.३१/०५/२०२२ पर्यंत ०५ वर्षे पुर्ण करणा-या पोलीस अंमलदार यांची बदली करण्यात येणार आहे.

५) पोलीस अंमलदार यांचे स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणुक / बदली करता येणार नाही. पोलीस मुख्यालयात काम करीत असलेल्या संवर्गातील कर्मचा-यांसाठी हा नियम लागु असणार नाही.

६) दिनांक ३१/०५/२०२२ पर्यंत ५ वर्ष पुर्ण करणा-या पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक(PC TO ASI) यांचे सोबत जोडलेल्या सहपत्र "अ" नमुन्यात विनंती अर्ज त्यांचे नांवाचे यादीसह या कार्यालयास दि.२६/०४/२०२२ पावेतो सादर करावे. केवळ पसंतीच्या ठिकाणीच बदली करणे हा शासकीय कर्मचा-यांचा हक्क नाही, त्यामुळे कर्मचा-यांनी पसंतिच्या ठिकाणी बदली करण्यास आग्रही असु नये. बदली करीता नमुद केलेल्या पसंतिच्या ठिकाणी बदली करण्या बाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील. मात्र रिक्त पद उपलब्ध नसल्यास प्रशासकीय दृष्टी कोनातुन इतर ठिकाणी रिक्त पदावर बदली करण्यात येईल.

७) बदलीस पात्र अंमलदारा व्यतीरिक्त बदली साठी विनंती अर्ज सोबतचे सहपत्र "ब" नमुन्यात या कार्यालयास दि.२६/०४/२०२२ पुर्वी पाठवावे, विनंती करणा-या पोलीस कर्मचा-यांनी **विनंती नुसार बदली मिळणे हा त्यांचा हक्क नाही.** रिक्त पदे विनंतीचे स्वरुप विचारात घेवुन प्रकरणाच्या गुणवत्ते नुसार बदली बाबतचे विनंती अर्ज निश्चीतपणे विचारात घेण्यात येतील.

//२//

८) बदलीसाठी पसंतीची ३ ठिकाणे देतांना मुळ स्वग्राम असलेल्या तालुक्यात नेमणुक / बदली अनुज्ञेय नसल्याने मुळ तालुक्याचा उल्लेख पसंतीच्या ठिकाणात करु नये. वरील बाब दुर्लक्षित करुन जे अंमलदार अर्जामध्ये पसंतीचे ठिकाण नमुद करतील त्यांची विनंती "अमान्य" करण्यात येईल.

९) बदली / नेमणुकी बाबत पोलीस अंमलदारांने अर्जाव्यतीरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडुन संदर्भ / विनंती करु नये. अशी विनंती अन्य कोणाही मार्फत पाठवु नये. पाठविल्यास त्यांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा त्यांचा अधिकार नसुन प्रशासकीय सोईनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवुन बदलीचा विचार केला जाईल. पसंतीचे ठिकाणी बदली मिळविणे करीता कोणत्याही प्रकारे दबाव / शिफारस असल्यास संबंधित कर्मचा-या विरुध्द गैरवर्तणाची दखल घेवुन महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपीले) आणि वर्तणुक नियमाखाली गंभिर कार्यवाही करण्यात येईल, तसेच त्यांचे सेवापटात त्या बद्दल नोंद घेण्यात येईल.

१०) पोलीस अंमलदार वर्षभरात केंव्हाही वेगवेगळया कारणास्तव बदलीसाठी अर्ज करतात, हे योग्य नाही. बदलीसाठी एप्रिल व मे हा कालावधि निश्चीत केल्यामुळे याच वेळात प्रामुख्याने बदलीची विनंती विचारात घेण्यात येईल. अन्यवेळी प्रशासकीय दृष्टया अशी विनंती मान्य करता येणार नाही. त्यामुळे भविष्यात पोलीस कर्मचा-यांनी सर्वसाधारण ठरलेल्या वेळे व्यतीरिक्त बदलीसाठी अर्ज / विनंत्या करु नये. त्या विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

११) पोलीस अंमलदारांच्या अर्जामध्ये त्यांची पोलीस स्टेशन /शाखेतील नेमणुकीचा दिनांक तैनाती रजिस्टारतुन तपासुन खात्री करावी, त्यामध्ये काही अपवादत्मक परिस्थिती उदभवल्यास सर्वस्व जबाबदारी संबंधित पोलीस कर्मचारी व संबंधित ठाणेदार व शाखा प्रभारी यांची राहील. तसेच ठाणेदार / प्रभारी शाखा अधिकारी यांनी अभिप्राय देतांना विनंती मध्ये नमुद बाबी ख-या आहेत किंवा कसे ? याबाबत अभिप्राय नमुद करावेत. फक्त शिफारस करु नये. ठाणेदाराचे अभिप्राय असल्याखेरीज अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही. बदल्यासाठी अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये सादर करावे. अपुर्ण व त्रोटक, साध्या कागदावरील अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

१२) डयुटीपासवर जे पोलीस अंमलदार आहेत त्यांचा नेमणूकीचे ठिकाणचा दिनांकीत कालावधी व डयुटीपासवर हजर झालेला दिनांकीत कालावधी बाबत वेगळी यादी सह माहिती सादर करावी.

१३) मागील सार्वजनिक बदलीमध्ये बदली झालेले परंतु अद्यापपावेतो बदलीचे ठिकाणी हजर न झालेल्या पोलीस अंमलदार यांची माहिती सादर करावी.

**१४)**नमुद प्रमाणे प्राप्त झालेली माहितीची संबीधीत पोलीस अंमलदार यांचे सेवापटावरुन पडताळणी करण्याची कार्यवाही आस्थापना शाखा यांनी करावी

१५) **सर्व ठाणेदार व शाखा प्रभारी अधीकारी यांनी आपले अधीपत्याखालील सर्व पोलीस अंमलदार यांची एकत्रीत माहि तयार करुन सदरची माहिती ही ई-मेल आयडी :-** sp.washim@mahapolice.gov.in वर **दिनांक २६/०४/२०२२** पावेतो सादर करावी. बदली संदर्भात कोणीही पोलीस अंमलदार आस्थापना शाखेत येणार नाही याची दक्षता घ्यावी.

१६) आपले येथे नेमणूकीस असलेले पोलीस अंमलदारा पैकी जे पोलीसं अंमलदार त्यांचे कर्तव्य व्यवस्थितरित्या पार पाडत नाहीत, गैरहजर व व्यसनाधीन आहेत यांचे कसुरीवरील बदलीचे अनुषंगाने त्यांचा अहवाल बंद पाकीटमध्ये पोलीस अधीक्षक यांचे लखुलेखक यांचे कडे सादर करावा.

**सहपत्र :- वरील प्रमाणे "अ" व "ब".**

**( बच्चन सिंह )**
भा.पो.से.
पोलीस अधिक्षक, वाशिम

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी,वाशिम/मंगरुळपीर/कारंजा/पोलीस उपअधिक्षक,आर्थिक गुन्हे शाखा, वाशिम/ ठाणेदार, पोलीस स्टेशन,वाशिम शहर/वाशिम ग्रामीण/मालेगांव/शिरपुर/रिसोड/अनसिंग/आसेगांव/जऊळका/मंगरुळपीर/ कारंजा शहर/कारंजा ग्रामीण/मानोरा/धनज बु./पोनि., स्थागुशा/मतनि/अंगुली मुद्रा/जिविशा/शवाशा/जिवाशा/ सायबर पो.स्टे.,/ वाचक शाखा/नियंत्रण

कक्ष/कल्याणशाखा/ दहशतवाद विरोधी पथक/पोउपनि.,मोपवि./बॉम्ब शोधक पथक/श्वान पथक/ राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय,वाशिम.

२/- आपण सदरचे परीपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पोलीस कर्मचारी(पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक) यांना दोन्ही वेळेच्या गणने मध्ये वाचुन दाखविण्यात यावे. तसेच सदरचे परीपत्रकाची एक प्रत पोलीस स्टेशन / शाखेतील नोटीस बोर्डावर लावण्यात यावी. ठाणेदार /शाखा प्रमुख यांनी पोलीस कर्मचा-यांचे विनंती अर्ज एकत्रीतपणे विहीत नमुन्यात मुदतीचे आत आपले स्वयंस्पष्ट अभिप्राय देवुन दिनांक २६/०४/२०२२ रोजी पर्यंत या कार्यालयास न चुकता सादर करावा, तसेच उशिराने प्राप्त झालेल्या विनंती अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

३/- तसेच सर्व उपविभागातील उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाण्यातील थाना प्रभारी व शाखा प्रभारी वाशिम जिल्हा यांना कळविण्यात येते की, त्यांचे ठाण्यातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक(PC TO ASI) यांचे पो.स्टे., व शाखेतील तैनाती रजिस्टर प्रमाणे ज्या कर्मचा-यांना दिनांक ३१/०५/२०२२ रोजी ५(पांच) वर्षाचा कालावधी पुर्ण होणार आहेत किंवा झाले आहेत अशा कर्मचाऱ्यांची यादी दिनांक २६/०४/२०२२ पर्यंत न चुकता या कार्यालयास सादर करावी. सदरची यादी सादर करतांना विलंब होणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रत माहितीस :-

अपर पोलीस अधिक्षक, वाशिम / पोलीस उप अधिक्षक(मुख्या.),वाशिम.

प्रत माहितीस व उचित कार्यवाहीस्तव रवाना :-

संगणक कक्ष/डिपीजी लिपीक पोलीस अधीक्षक, कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष यांनी सदरचे परिपत्रक त्वरीत पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे **"संकेतस्थळावर"** सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्यात तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रभारी/रापोनि.,पोमु.,वाशिम यांना **"ई-मेल"** द्वारे त्वरीत कळवावे. तसेच ईमेलवर प्राप्त झालेली माहिती आस्थापना शाखेत विनाविलंब सादर केल्या जाईल याची नोंद घ्यावी.

Transfer

**सहपत्र - "अ"**

**(प्रशासकीय कारणास्तव एका ठिकाणी दिनांक ३१/०५/२०२२ रोजी ५ वर्ष किंवा ५ वर्षापेक्षा जास्त)**

सर्वसाधारण बदल्या-२१-२२ करीता सध्याच्या पदावरील ५ वर्ष पुर्ण किंवा ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचा बदलीसाठी भरावयाचे प्रपत्र

१७) कर्मचा-यांचे संपूर्ण नांव व पदनाम :---------------------------------------------------------------------------------------ब.नं.---------

१८) सध्याचे नेमणुक ठिकाण व कालावधी :----------------------------------------------------------------------------------------------

१९) पो.स्टे.,/शाखेतील नेमणुकीचा दिनांक :- -----------------------------------------------------------------------------------------

२०) स्वतःचे मुळगांव / तालुका/ जिल्हा चे नांव नमुद करावे :--------------------------------------------------------------------------

२१) स्वग्राम तालुक्यात येणारे पो.स्टे.,चे नांव :----------------------------------------------------------------------------------

२२) सन-२०२१-२०२२ या शैक्षणीक वर्षात १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलांची नावे :------------------------------------------------------

२३) १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचा नांव :-------------------------------------------------------------------------------

२४) सन-२०२१-२०२२ या शैक्षणीक वर्षात १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलांची नावे :------------------------------------------------------

२५) १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचा नांव :-------------------------------------------------------------------------------

२६) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी जंगी / स्थावर मालमत्ता / कुटूंबाचा व्यवसाय आहे काय :- होय / नाही.(आहे तर तसा उल्लेख करावा.):---------
--------------------------------------------------------------------------------------------------------------------------

२७) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी या अगोदर कर्तव्य पार पाडले आहे काय ? असल्यास त्या पो.स्टे./शाखेचा नांव व कालावधी नमुद करावा :-------
--------------------------------------------------------------------------------------------------------------------------

२८) या पुर्वीच्या ५ वर्षात झालेली बदली रद्द झाली होती काय ? होय किंवा नाही. तसेच या अर्ज करण्याचे अगोदर बदली झाली होती काय ? होय / नाही (असल्यास ते नमुद करावे) :-----------------------------------------------------------------------------------------

२९) या पुर्वीचे नेमणुकीचा ठिकाण नमुद करावा :-

३) पो.स्टे.--------------------पासुन------------------पर्यत----------२) पो.स्टे.--------------------पासुन-----------------पर्यत----------

५) पो.स्टे.--------------------पासुन------------------पर्यत----------४) पो.स्टे.--------------------पासुन-----------------पर्यत---------

७) पो.स्टे.--------------------पासुन------------------पर्यत----------६) पो.स्टे.--------------------पासुन-----------------पर्यत----------

३०) बदली पाहीजे असलेले पसंतीचे तीन ठिकाण नमुद करावा(**स्वग्राम / तालुका** व यापुर्वी नौकरी केलेले ठिकाणाचे नांवाचे उलेल्ख करु मागु नये)

१.-----------------------------------------------२.-----------------------------------------------३.-------------------------------------

३१) कर्मचाऱ्यांची विनंती:------------------------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------------------------------------------------

(मला पाहिजे असलेल्या बदली नेमणुकीबाबत या अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडे संदर्भ / विनंती केलेली नाही. अशी विनंती अन्य कोणाही मार्फत प्राप्त झाल्यास तिचा माझेशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवु नये. विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसुन प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवुन माझा विचार केला जाईल हि बाब मला मान्य आहे. तसेच मी वरील प्रमाणे भरलेली माहिती बरोबर आहे यामध्ये काही विसंगती आढळून आल्यास त्यामध्ये मी स्वंतः जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.)

(अर्जदाराची स्वाक्षरी)

३२) ठाणेदार यांची शिफारस :---------------------------------------------------------------------------------------------------

वर नमुद अर्जदार यांनी भरलेली माहिती मी स्वंतः पोलीस स्टेशन / शाखेतील तैनाती रजिस्टर वरुन त्यांच्या नेमणुकीचा दिनांक बरोबर आहे हे मी तपासले असुन बरोबर आहे.

(ठाणेदार /शाखा प्रभारी यांची स्वाक्षरी व शिक्का)

Transfer

**सहपत्र - "ब" (विनंती वरुन स्वखर्चाने)**

सर्वसाधारण बदल्या-२०२२-२३ करीता

सध्याच्या पदावरील कार्यकाळ पुर्ण झाला नसतांना विनंती वरुन स्वखर्चाने बदलीसाठी भरावयाचे प्रपत्र

१४) कर्मचा-यांचे संपूर्ण नांव व पदनाम :------------------------------------------------------------ब.नं.----

१५) सध्याचे नेमणुक ठिकाण व कालावधी :------------------------------------------------------------

१६) पो.स्टे.,/शाखेतील नेमणुकीचा दिनांक :- ------------------------------------------------------------

१७) स्वतःचे मुळगांव / तालुका/ जिल्हा चे नांव नमुद करावे :------------------------------------------------------------

१८) स्वग्राम तालुक्यात येणारे पो.स्टे.,चे नांव :------------------------------------------------------------

१९) सन-२०२१-२०२२ या शैक्षणीक वर्षात १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलांची नावे :------------------------------------------------------------

२०) १० वी मध्ये शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचा नांव :------------------------------------------------------------

२१) सन-२०२१-२०२२ या शैक्षणीक वर्षात १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलांची नावे :------------------------------------------------------------

२२) १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलांच्या शाळेचा नांव :------------------------------------------------------------

२३) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी जंगी / स्थावर मालमत्ता / कुटूंबाचा व्यवसाय आहे काय :- होय / नाही.(आहे तर तसा उल्लेख करावा.):---------
------------------------------------------------------------

२४) ज्या ठिकाणी बदली पाहिजे आहे त्या ठिकाणी या अगोदर कर्तव्य पार पाडले आहे काय ? असल्यास त्या पो.स्टे./शाखेचा नांव व कालावधी नमुद करावा :-------
------------------------------------------------------------

२५) या पुर्वीच्या ५ वर्षात झालेली बदली रद्द झाली होती काय ? होय किंवा नाही. तसेच या अर्ज करण्याचे अगोदर बदली झाली होती काय ? होय / नाही (असल्यास ते नमुद करावे) :------------------------------------------------------------

२६) या पुर्वीचे नेमणुकीचा ठिकाण नमुद करावा :-

१) पो.स्टे.--------------------पासुन-------------------पर्यत----------- २) पो.स्टे.--------------------पासुन-----------------पर्यत-----------

३) पो.स्टे.--------------------पासुन-------------------पर्यत---------- ४) पो.स्टे.--------------------पासुन-----------------पर्यत----------

५) पो.स्टे.--------------------पासुन-------------------पर्यत---------- ६) पो.स्टे.--------------------पासुन-----------------पर्यत----------

१४) बदली पाहीजे असलेले पसंतीचे तीन ठिकाण नमुद करावा(**स्वग्राम / तालुका** व यापुर्वी नौकरी केलेले ठिकाणाचे नांवाचे उलेल्ख करु मागु नये)

१.----------------------------------------------२.----------------------------------------------३.--------------------------------------

१५) कर्मचाऱ्यांची विनंती:------------------------------------------------------------
------------------------------------------------------------

(मला पाहिजे असलेल्या बदली नेमणुकीबाबत या अर्जाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडे संदर्भ / विनंती केलेली नाही. अशी विनंती अन्य कोणाही मार्फत प्राप्त झाल्यास तिचा माझेशी संबंध नाही व त्याचा विचार करण्यात येवु नये. विनंती केलेल्या जागी बदली मिळणे हा माझा अधिकार नसुन प्रशासकीय सोयीनुसार व उपलब्ध रिक्त पदांची स्थिती विचारात घेवुन माझा विचार केला जाईल हि बाब मला मान्य आहे. तसेच मी वरील प्रमाणे भरलेली माहिती बरोबर आहे यामध्ये काही विसंगती आढळून आल्यास त्यामध्ये मी स्वंतः जबाबदार राहील याची मला जाणीव आहे.)

(अर्जदाराची स्वाक्षरी)

१६) ठाणेदार यांची शिफारस :------------------------------------------------------------

वर नमुद अर्जदार यांनी भरलेली माहिती मी स्वंतः पोलीस स्टेशन / शाखेतील तैनाती रजिस्टर वरुन त्यांच्या नेमणुकीचा दिनांक बरोबर आहे हे मी तपासले असुन बरोबर आहे.

(ठाणेदार /शाखा प्रभारी यांची स्वाक्षरी व शिक्का)

Transfer